मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# अनधिकृत पाणीउपसा करणाऱ्यांवर गुन्हे

## वाढलेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर वॉशिंग सेंटरवरही महापालिकेची कडक कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाढत्या उन्हामुळे पाण्याची मागणी वाढल्याने काही नागरिक महापालिकेच्या नळाला विद्युत मोटार पंप जोडून पाणी घेत असल्याची बाब उघड झाल्यानंतर अशा नागरिकांवर आणि पिण्याचे पाणी वापरणाऱ्या वॉशिंग सेंटरचालकांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने दिला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली, मोशी, चऱ्होली, दिघी, भोसरी, डुडुळगाव, थेरगाव, दापोडी, काळेवाडी, किवळे, सांगवी, वाल्हेकरवाडीसह शहराच्या विविध भागांत पाणीपुरवठा अपुरा आणि कमी दाबाने होत असल्याच्या तक्रारी आहेत. 'नागरिकांनी वाहने धुणे, अंगणामध्ये, रस्त्यावर पिण्याचे पाणी मारणे टाळावे,' असे आवाहन महापालिकेने केले आहे. नागरिक महापालिकेच्या नळजोडाला दुसऱ्या, तिसऱ्या मजल्यावर अनधिकृतपणे इलेक्ट्रिक विद्युत मोटार जोडून मोठ्या प्रमाणात पाणी उपसतात. त्यामुळे परिसरातील इतर नागरिकांच्या तक्रारी वाढल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले.

पिंपळे निलख परिसरात नळजोडाद्वारे पाणीउपसा करणाऱ्या नागरिकांचे १२ विद्युत मोटारपंप जप्त करण्याची कारवाई करण्यात आली. शहरातील इतर भागांतही मोटर पंप जोडून पाणी घेणाऱ्या नागरिकांच्या मोटारी जप्त करून गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

जास्त पाणी मिळावे, म्हणून काही नागरिक महापालिकेच्या नळजोडाला विद्युत मोटार जोडून पाणी घेतात. एक मोटार २० घरांचे पाणी खेचून घेते. त्यामुळे परिसरातील पाणीपुरवठा विस्कळीत होतो. नळजोडाला मोटार जोडून पाणीउपसा करणारे आणि पिण्याचे पाणी वाहने धुण्यासाठी वापरणाऱ्या वॉशिंग सेंटरचालकांवर गुन्हे दाखल केले जाणार आहेत, असे पिंपरी-चिंचवड महापालिका पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले.




### सहा वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा

» सर्वांना मुबलक व पुरेसे पाणी मिळण्यासाठी महापालिकेने नोव्हेंबर २०१९ मध्ये काही दिवसांसाठी एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला होता. काही दिवसांसाठीचा एक दिवसाआडचा पाणीपुरवठा पुढे कायम ठेवण्यात आला आहे. सहा वर्षे होत आले, तरी एक दिवसाआडच पाणीपुरवठा होत आहे. धरणात मुबलक पाणी असतानाही नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही. शहरातील विविध भागातून विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या तक्रारी येत आहेत. वाढीव पाणी मिळत नाही, तोपर्यंत दररोज पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचे प्रशासन सांगत आहे.

### शहराला दररोज होणारा पाणीपुरवठा

- » पवना धरण – ५५० दशलक्ष लीटर
- » आंद्रा धरण – ८० दशलक्ष लीटर
- » एमआयडीसी – २० दशलक्ष लीटर
- » एकूण – ६५० दशलक्ष लीटर

### भामा आसखेडचे काम संथगतीने


» पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या लोकसंख्येसाठी भामा आसखेड धरणातून १६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी आणण्याचे महापालिकेने हाती घेतलेले काम संथगतीने सुरु आहे. डिसेंबर २०२४ मध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन असताना अशुद्ध जलउपसा केंद्र, पंपिंग स्टेशन, जलवाहिनीची कामे अद्यापही सुरू आहेत. ठेकेदाराला दिलेल्या एक वर्षाच्या (डिसेंबर २०२५) मुदतीतही काम पूर्ण होणार नसल्याने आता

# पिंपळे सौदागर येथील पोस्ट ऑफिस कार्यालयाचे लवकरच उद्घाटन

## नाना काटे यांच्या पाठपुराव्याला यश; पिंपळे सौदागर चा नवीन पिन कोड 411083

**पिंपरी | प्रतिनिधी**

रहाटणी-पिंपळे सौदागर या प्रभागाचा झपाट्याने विकास झाला असून येथील लोकसंख्या एक लाखांहून अधिक आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणावर सहकारी गृहनिर्माण संस्था असून विविध खासगी व सरकारी कार्यालये, शाळा आणि महाविद्यालये देखील आहेत. मात्र पोस्ट ऑफिससंबंधित कामासाठी येथील नागरिकांना चिंचवड किंवा औंध, पुणे येथे जावे लागत होते. ही



गैरसोय लक्षात घेऊन माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी पोस्ट ऑफिस सुरू करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

त्यांच्या प्रयत्नांमुळे शिवार चौक येथे २०१० साली टपाल पेटी बसविण्यात आली तसेच दर सोमवारी कुणाल आयकॉन रोड येथे पोस्ट ऑफिसची फिरती गाडी उपलब्ध करून देण्यात आली. परंतु देखील जेष्ठ नागरिक किवां महिला यांना अनेक समस्याला सामोरे जावे लागत होते ही बाब विचारात घेता, पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांची वाढती मागणी लक्षात घेऊन नाना काटे यांनी पोस्ट ऑफिस सुरू करण्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरूच ठेवला. त्यांनी परिसरातील विविध खासगी व सरकारी जागा तसेच गाळे सुचवून तेथे पोस्ट ऑफिस सुरू करण्याबाबत विनंतीपत्रे दिली व प्रत्यक्ष भेटूनही सूचना केल्या.

( उर्वरित पान 2 वर )

# पिंपरी-चिंचवडमध्ये मालमत्ताकर अभय योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विलंब दंडात 90% सवलतीमुळे सहा दिवसांत सुमारे 20 कोटींचा भरणा; 7,400 थकबाकीदारांना दिलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील थकबाकीदारांना मालमत्ताकराचे बिले भरता यावीत म्हणून विलंब दंडात तब्बल 90 टक्क्यांची सवलत देण्यात आली आहे. त्या अभय योजनेला थकबाकीदारांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. योजना सुरू झाल्यापासून महापालिका तिजोरीत तब्बल 20 कोटी रुपयांचा भरणा झाला आहे. तर, तब्बल 7 हजार 400 थकबाकीदारांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे

शहरातील 2 लाख 12 हजार 440 मालमत्ताधारकांनी 28 फेब्रुवारीपर्यंत मालमत्ताकर भरलेला नव्हता. थकीत मालमत्ताकर वसुलीस गती देण्यासाठी 1 मार्चपासून महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून अभय योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक व मोकळ्या जागा यांची थकबाकी एकरकमी भरल्यास विलंब दंडावर 90 टक्के सवलत दिली जात आहे. ती योजना 31 मार्चपर्यंत आहे.




### संपूर्ण बिल भरून सवलतीचा लाभ घ्या

» पाच, दहा तसेच पंधरा वर्षे थकलेली बिले नागरिक भरून अभय योजनेतील मोठ्या सवलतीचा लाभ घेत आहेत. दररोज 5 कोटी रुपयांचा भरणा होत आहे. शेवटच्या टप्प्यात त्यात मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे. नागरिकांना बिल भरण्यासाठी सर्व 18 विभागीय कार्यालयातील कॅश काउंटर सुटीच्या दिवशीही खुले ठेवण्यात आली आहेत. ही अभय योजना 31 मार्च महिन्यापुरती मर्यादित आहे. नागरिकांनी थकबाकीसह संपूर्ण बिल भरून भरघोस सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे.

त्या दोन 2 लाख 12 हजार 440 मालमत्ताधारकांनी बिल भरलेले नाही. निवासी मालमत्ता सर्वाधिक 1 लाख 80 हजार 27 इतक्या असून, थकबाकी तब्बल 404 कोटी 75 लाख इतकी आहे. तर, बिगरनिवासी 18 हजार 284 मालमत्ताधारकांकडे एकूण 341 कोटी 58 लाखांची थकबाकी आहे. पाच हजार 233 मिश्र मालमत्ताधारकांकडे 5 हजार 233, एक हजार 341 औद्योगिक मालमत्ताधारकांकडे 18 कोटी 2 लाख, पाच हजार 308 मोकळ्या जमीनधारकांकडे एकूण 374 कोटी 41 लाख आणि इतर 247 जणांकडे 40 लाखांची थकबाकी आहे.

योजना लागू झाल्यापासून थकबाकीदारांकडून संपूर्ण बिल भरण्यात येत आहे. रविवार (दि.1) पासून शुक्रवार (दि.6) पर्यंत सहा दिवसांत तब्बल 7 हजार 378 मालमत्ताधारकांनी एकूण 19 कोटी 89 लाख रुपयांचा भरणा केला आहे. त्यांना विलंब दंडात मोठी सूट मिळाली आहे.

### अभय योजनेला प्रतिसाद

» पिंपरी-चिंचवड महापालिकेने थकीत मालमत्ताकर वसुलीस गती देण्यासाठी सुरू केलेल्या अभय योजनेला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेअंतर्गत विलंब दंडात तब्बल 90 टक्के सवलत देण्यात येत असल्याने अनेक थकबाकीदार पुढे येत आहेत. योजना सुरू झाल्यापासून अवघ्या सहा दिवसांत 7 हजार 378 मालमत्ताधारकांनी कर भरत महापालिका तिजोरीत सुमारे 19 कोटी 89 लाख रुपयांचा भरणा केला आहे. त्यामुळे सुमारे 7 हजार 400 थकबाकीदारांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून उर्वरित थकबाकीदारांनाही या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

### थकबाकीदारांची मोठी संख्या

» पिंपरी-चिंचवड शहरात तब्बल 2 लाख 12 हजार 440 मालमत्ताधारकांनी 28 फेब्रुवारीपर्यंत मालमत्ताकर भरलेला नाही. यामध्ये निवासी मालमत्ता सर्वाधिक असून 1 लाख 80 हजार 27 मालमत्ताधारकांकडे सुमारे 404 कोटी 75 लाख रुपयांची थकबाकी आहे. बिगरनिवासी 18 हजार 284 मालमत्ताधारकांकडे 341 कोटी 58 लाख, औद्योगिक मालमत्तांवर 18 कोटी 2 लाख तर मोकळ्या जागांवर 374 कोटी 41 लाख रुपयांची थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिकेने 1 मार्चपासून अभय योजना सुरू केली असून ती 31 मार्चपर्यंत लागू राहणार आहे.

---

# मेट्रोमध्ये महिला व ज्येष्ठांसाठी राखीव जागा

## प्रत्येक ट्रेनमध्ये 54 जागा राखीव; महिला दिनापासून निर्णयाची अंमलबजावणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महाराष्ट्र मेट्रो कॉर्पोरेशन (महामेट्रो) च्या प्रवासात महिला आणि ज्येष्ठांसाठी राखीव जागा नसल्याने त्याची मोठी गैरसोय होत होती. या पार्श्वभूमीवर महिला आणि ज्येष्ठांकडून राखीव जागा ठेवण्याची मागणी करण्यात आली होती.

ही मागणी लक्षात घेत मेट्रो व्यवस्थापनाने मेट्रोच्या तिन्ही डब्यांत महिला व ज्येष्ठांसाठी राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक महिला दिन 8 मार्चपासून हा निर्णय लागू करण्यात करण्यात येणार असल्याची माहिती पुणे मेट्रोकडून देण्यात आली आहे.

वनाझ ते रामवाडी आणि पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मार्गावर सध्या मेट्रो धावत आहे. पिंपरी, संत तुकाराम नगर, भोसरी, (नाशिक फाटा), कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी, बोपोडी, असे एकूण सहा थांबे आहेत. मेट्रोमधून सध्या दोन लाखांपेक्षा जास्त प्रवासी प्रवास करतात. यामध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त प्रमाणात आहे. त्यामुळेच पुणे मेट्रोच्या प्रत्येक ट्रेनमधील तिन्ही डब्यांमध्ये महिला आणि ज्येष्ठांसाठी विशेष आसन व्यवस्था करण्यात आली आहे. या संदर्भात दैनिक पुढारीमध्ये वृत्त प्रसिद्ध करण्यात आले होते. या वृत्ताची महामेट्रो व्यवस्थापकाने दखल घेत ज्येष्ठ आणि महिलांसाठी राखीव आसन करण्याचा निर्णय घेतला आहे.



### प्रत्येक ट्रेनमध्ये 54 जागा राखीव

» पहिला कोच (डीएमए कार) महिलांसाठी 14, ज्येष्ठ नागरिक -2
» मधला कोच - (टी- कार) महिलांसाठी 18, ज्येष्ठ नागरिक 4
» तिसरा कोच- (डीएमबी कार) महिलांसाठी 14 ज्येष्ठ नागरिक 2

# पिंपळे सौदागर येथील पोस्ट ऑफिस कार्यालयाचे लवकरच उद्घाटन

(पान 1 वरून)

या संदर्भात त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचीही भेट घेऊन मदत मागितली. अजितदादा पवार यांनी देखील याची दखल घेत प्रशासन स्तरावर पाठपुरावा करून आवश्यक सहकार्य केले. नाना काटे यांनी २०१७ पासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे दिल्ली व पुणे येथील पोस्ट ऑफिस प्रशासनाने पिंपळे सौदागर येथे पोस्ट ऑफिस सुरू करण्यास सहमती दर्शविली.

पोस्ट ऑफिस हे सामान्य नागरिकांच्या सोयीसाठी असल्यामुळे त्याचे वार्षिक भाडे कमी असावे तसेच मिळकत करात सवलत देण्यात यावी, अशी विनंतीही मा. अजितदादा पवार यांच्याकडे करण्यात आली होती. त्यांच्या सूचनेनुसार महापालिकेने सकारात्मक प्रतिसाद देत भारतीय पोस्ट विभागाच्या धोरणानुसार वार्षिक भाडे निश्चित केले. या पाठपुराव्याचे पुढील पाऊल म्हणून पिंपळे सौदागर येथील मंजूर पोस्ट ऑफिससाठी नवीन पिन कोड ४११०८३ देखील मंजूर करण्यात आला. कोणताही गाजावाजा न करता किंवा श्रेय न घेता नाना काटे यांनी नागरिकांच्या सोयीसाठी हा पाठपुरावा सातत्याने सुरू ठेवला. काही दिवसांतच दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या हस्ते या पोस्ट ऑफिसचे उद्घाटन करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र त्यांच्या निधनामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. आता लवकरच या पोस्ट ऑफिसचे उद्घाटन करण्यात येणार आहे अशी माहिती नाना काटे यांनी दिली आहे.

# पुणे महापालिकेत स्वीकृत नगरसेवकपदासाठी 700 अर्ज

## पक्षांच्या शिफारशीवरच अंतिम नावे; अनेक अर्ज बाद होण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका अधिनियमातील तरतुदींनुसार स्वीकृत सदस्यांची नावे राजकीय पक्षांच्या संख्याबळानुसार गटनेत्यांशी चर्चा करून निश्चित करावीत, असा नियम आहे. स्वीकृत सदस्यांची नावे ही सर्वसाधारण सभेमार्फत अंतिम केली जातात. मात्र, हा नियम डावलून अनेकांनी थेट आयुक्तांकडे अर्ज दाखल केले आहेत. महापालिकेत पहिल्यांदाच असे घडले आहे. नव्या नियमानुसार सभागृहातील बलानुसार भाजपचे 10, राष्ट्रवादीचे 2 आणि कॉंग्रेसचा 1 स्वीकृत नगरसेवक होणार आहे. यासाठी मोठी स्पर्धा असली तरी हे पक्ष सोमवारी त्यांचे उमेदवार अंतिम करणार आहेत. त्यामुळे जे अर्ज थेट आले आहेत, ते बाद होण्याची शक्यता अधिक आहे.




### अर्ज छाननीसाठी चार सदस्यांची समिती

» स्वीकृत नगरसेवकांच्या अर्जांची छाननी करण्यासाठी महापालिकेच्या निवडणूक विभागाने यावर्षी स्वतंत्र समिती नेमली आहे. यात निवडणूक उपायुक्त प्रसाद काटकर, कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त रवी पवार, उपायुक्त विजयकुमार थोरात व उपायुक्त सोमनाथ आढाव या अधिकाऱ्यांचा समावेश आहे, तसेच त्यांच्या मदतीसाठी 8 कर्मचारीदेखील नियुक्त करण्यात आले आहेत.

महापालिका निवडणुकीनंतर आता स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीची प्रक्रिया सुरू झाली आहे. महापालिका आयुक्तांनी महापालिकेतील राजकीय पक्षांच्या संख्याबळानुसार संबंधित गटनेत्यांशी चर्चा करून त्यांच्याकडून नावे मागवायची आहेत. स्वीकृत नगरसेवकपदावर आपली वर्णी लागावी, यासाठी मोठ्या प्रमाणात इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून असून, त्यांच्याकडून पक्षनेत्यांकडे फिल्डिंग लावली जात आहे. तिन्ही पक्षांकडे इच्छुकांची मोठी संख्या आहे. स्वीकृत नगरसेवकपदासाठी सोमवारी (दि, 9) 11 ते 2 या वेळेत अर्ज दाखल करण्याची मुदत आहे. त्यापूर्वी तब्बल 700 ते 800 इच्छुकांनी महापालिका आयुक्तांकडे स्वीकृत नगरसेवकपदासाठी लेखी अर्ज सादर केले आहेत. याबाबत त्यांना लागणारी कागदपत्रेही त्यांनी जमा केली आहेत.

महाराष्ट्र महापालिका अधिनियम, 1949 मधील कलम 5 (2) नुसार स्वीकृत नगरसेवक निवडीसाठी पात्रतेचे निकष आणि निवड प्रक्रिया काय असावी, याचे नियमही अधिनियमात नमूद केलेले आहेत. त्या नियमानुसार महापालिका आयुक्तांनी निवडून आलेल्या पक्षांच्या संख्याबळानुसार गटनेत्यांशी चर्चा करून स्वीकृत सदस्यांची नावे निश्चित करायची असतात. राजकीय पक्षांकडून नावांची शिफारस केल्यावर नावासंदर्भात महापालिका आयुक्त महापौर आणि इतर गटनेत्यांशी चर्चा करतात. मान्यतेसाठी ही नावे सभागृहासमोर ठेवली जातात. यात महत्त्वाची बाब म्हणजे आयुक्तांकडून आलेल्या या नावांपैकी एखादे नाव फेटाळण्याचा अधिकार सभागृहाला असतो. तसेच नावे का फेटाळण्यात आली, याचे कारण देखील सभागृहाला सांगावे लागते, अशी नियमावली असताना देखील अनेक नागरिकांनी स्वतःहून महापालिका प्रशासनाकडे अर्ज सादर केले असून, ते स्वीकारलेही गेले आहेत.

### कोणत्या पक्षाला किती जागा?

» नव्या नियमानुसार सभागृहातील बलानुसार भाजपचे 10, राष्ट्रवादीचे 2 आणि कॉंग्रेसचा 1 स्वीकृत नगरसेवक होणार आहे. यासाठी मोठी स्पर्धा असली तरी हे पक्ष सोमवारी त्यांचे उमेदवार अंतिम करणार आहेत. त्यामुळे जे अर्ज थेट आले आहेत, ते बाद होण्याची शक्यता अधिक आहे.

“ भाजपकडून स्वीकृत नगरसेवकपदासाठी यादी सोमवारी महापालिका आयुक्तांकडे दिली जाईल. पुणे महापालिका निडणुकीवेळी अनेकांनी तिकिटाची मागणी केली होती. परंतु, काही जणांना उमेदवारी देता आली नाही. त्यातील काही जणांचा स्वीकृत नगरसेवकपदासाठी विचार केला जाईल. पराभूत उमेदवारांनी संधी दिली जाणार नाही, हे यापूर्वीच भाजप प्रदेशाने सांगितले आहे. त्यामुळे जी काही नावे येणार आहेत, ती प्रदेशाकडूनच येतील.

- धीरज घाटे, शहराध्यक्ष, भाजप.

---

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील एकात्मिक दुमजली उड्डाणपूल पुणेकरांच्या सेवेत

## एकात्मिक दुमजली उड्डाणपूलाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील एकात्मिक दुमजली उड्डाणपूलाचे लोकार्पण रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. पुण्यासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरासाठी मजबूत पायाभूत सुविधा अत्यावश्यक असून शहराला वाहतूक कोंडीतून मुक्त करण्यासाठी शासनाकडून बहुआयामी नियोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,

राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार सिद्धार्थ शिरोळे,पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे तसेच पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विद्यापीठ चौकातील जुना पूल पाडून नवीन दुमजली उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेताना अनेक अडचणी आणि मतभेद होते. मात्र सर्वांना विश्वासात घेऊन आणि विविध पक्षांच्या नेत्यांचे सहकार्य मिळवून हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. या प्रक्रियेत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारयांनी घेतलेला पुढाकार महत्त्वाचा होता, असे त्यांनी नमूद केले.

पुणे हे देशातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असून आयटी क्षेत्रासह 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स'चे महत्त्वाचे केंद्र म्हणून शहराचा विकास होत असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे शहराला 'डी-कंजेस्ट' करण्यासाठी उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, भुयारी मार्ग, मेट्रो आणि रिंग रोडसारखे प्रकल्प राबविले जात आहेत. पुण्यात वाहतुकीसाठी जमिनीवर, आकाशात आणि जमिनीखाली अशा तिन्ही स्तरांवर काम सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठ चौकातील या उड्डाणपुलाला दिवंगत अजित पवार यांचे नाव देण्याबाबत व्यक्त झालेल्या भावनांचा सकारात्मक विचार केला जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

### रिंग रोड व मेट्रो प्रकल्पांना गती

» पुणे आणि परिसरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विविध पायाभूत प्रकल्प वेगाने राबविले जात आहेत. शहरासाठी दोन चक्राकार रिंग रोड प्रकल्प राबविण्यात येत असून मेट्रोचे जाळेही टप्प्याटप्प्याने विस्तारले जात आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पीएमपीएल आणि इतर सेवांनाही बळ दिले जात आहे. विद्यापीठ चौकातील उड्डाणपुलाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्याबाबत व्यक्त झालेल्या भावनांचा सकारात्मक विचार केला जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# महाविद्यालयांची 'फी' वसुली आता रडारवर! सरकारचा कडक इशारा...

## शुल्क नियामक प्राधिकरणाचे 'इतर शुल्का'वरही लक्ष; नियमांचे उल्लंघन करणाऱ्या महाविद्यालयांची चौकशी होणार

**पुणे | प्रतिनिधी**

शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या खिशाला कात्री लावणाऱ्या खासगी शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांच्या मनमानी कारभाराला आता लगाम बसणार आहे. ट्यूशन फीच्या नावाखाली नाममात्र शुल्क दाखवायचे आणि प्रत्यक्षात 'इतर शुल्का'च्या नावाखाली पालकांची लूट करायची, हा प्रकार आता महाविद्यालयांना चांगलाच महागात पडणार आहे. राज्य शासनाने आणि शुल्क नियामक प्राधिकरणाने यासंदर्भात कडक पावले उचलली असून, नियम मोडणाऱ्या महाविद्यालयांचे धाबे आता दणाणले आहेत.



### नियमांचे उल्लंघन केल्यास थेट चौकशी

» राज्यातील अनेक कुटुंबांना उत्पन्नाच्या मर्यादेनुसार शुल्क सवलत मिळते. मात्र, महाविद्यालये ती सवलत कागदावरच ठेवून इतर मार्गांनी पैसे वसूल करतात. आता शासनाने स्पष्ट केले आहे की, ट्यूशन फीप्रमाणेच इतर शुल्कांवरही बारीक लक्ष ठेवले जाईल. जे महाविद्यालय नियमांचे उल्लंघन करेल, त्यांना केवळ दंडच नाही तर थेट चौकशीला सामोरे जावे लागणार आहे.

राज्य शासनाने मुलींसाठी व्यावसायिक शिक्षण मोफत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मात्र, काही संस्थांनी यावरही पळवाट शोधली आहे. मोफत प्रवेश देऊनही पॉवर चार्जिंग, कॉम्प्युटर लॅब मेंटेनन्स अशा विविध नावांनी मुलींकडून पैसे उकळले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. आर्ट्स, सायन्स आणि कॉमर्सच्या बाबतीतही हेच चित्र असून, 'अदर फी'च्या नावाखाली होणारी ही वसुली आता थेट शुल्क नियामक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली येणार आहे.

राज्यातील अनेक कुटुंबांना उत्पन्नाच्या मर्यादेनुसार शुल्क सवलत मिळते. मात्र, महाविद्यालये ती सवलत कागदावरच ठेवून इतर मार्गांनी पैसे वसूल करतात. आता शासनाने स्पष्ट केले आहे की, ट्यूशन फीप्रमाणेच इतर शुल्कांवरही बारीक लक्ष ठेवले जाईल. जे महाविद्यालय नियमांचे उल्लंघन करेल, त्यांना केवळ दंडच नाही तर थेट चौकशीला सामोरे जावे लागणार आहे.

शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या खिशाला कात्री लावणाऱ्या खासगी शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांच्या मनमानी कारभाराला आता लगाम बसणार आहे. ट्यूशन फीच्या नावाखाली नाममात्र शुल्क दाखवायचे आणि प्रत्यक्षात 'इतर शुल्का'च्या नावाखाली पालकांची लूट करायची, हा प्रकार आता महाविद्यालयांना चांगलाच महागात पडणार आहे.

### महाविद्यालयाला दंड

» आमदार अस्लम शेख यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले की, संबंधित विद्यापीठाने या प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे.या महाविद्यालयाकडून अतिरिक्त वसूल केलेली रक्कम केवळ परतच घेतली नाही, तर त्यावर मोठा दंडही ठोठावण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हा दंडाचा निधी विद्यार्थ्यांच्या विकासासाठीच वापरला जाणार आहे. या निर्णयामुळे अतिरिक्त शुल्क घेणाऱ्या संस्थांना स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत.

"उच्च शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू विद्यार्थी असायला हवा. विद्यार्थ्यांकडून कोणत्याही नावाखाली अतिरिक्त शुल्क आकारले जाणे योग्य नाही. शासनाने आणि शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कांनुसारच महाविद्यालयांनी शुल्क आकारणे अपेक्षित आहे. शिक्षण व्यवस्था ही विद्यार्थी-केंद्रित आणि सर्वसमावेशक असावी, ज्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यावर अनावश्यक आर्थिक भार पडणार नाही आणि प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाची समान संधी मिळेल. त्यामुळे सर्व संस्थांनी पारदर्शकता राखत नियमांचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे."

- डॉ. निवेदिता एकबोटे, प्राचार्या,
मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर.

# एकदाच घेणार हस्तांतरण शुल्क! महापालिकेचा नांदेड सिटीसाठी मोठा निर्णय

## नागरी सुविधा केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या तक्रारींची दखल; नांदेड सिटी परिसरात लवकरच वाढीव कर्मचारी नियुक्त होणार.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या २०२१ मध्ये झालेल्या हद्दवाढीत नांदेड सिटीचा समावेश महापालिकेत करण्यात आला आहे. त्यानंतर या भागातील मिळकतींची नोंदणी महापालिकेकडे करताना २०२१ पूर्वी मिळकतीचे जेवढ्या वेळा हस्तांतरण झाले आहे. त्या प्रत्येक हस्तांतरणाचे शुल्क आकारले जात होते. या पुढे केवळ २०२१ नंतरचेच हस्तांतरण शुल्क आकारले जाणार असल्याची माहिती महापालिकेच्या मिळकतकर विभागाचे उपायुक्त रवी पवार यांनी दिली.



महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या वतीने नांदेड सिटीत शनिवारी 'प्रशासन आपल्या दारी' या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी नांदेड सिटीतील नागरिकांच्या मिळकतकर विषयक असलेल्या समस्यांचे निराकारण तसेच प्रश्नांची उत्तरे प्रशासनाकडून देण्यात आली.

नगरसेवक काका चव्हाण, सुभाष नाणेकर, अनिता इंगळे, धनश्री कोल्हे, सहायक आयुक्त दीपक राऊत, इंद्रायणीकरचे तसेच कर विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय पंकज देडगे, ॲड. नरसिंह लगड, दत्तात्रय देडगे, माजी सरपंच नांदेड गाव, धुमाळ तसेच नांदेड सिटी सोसायटीचे पदाधिकारी आणि सोसायटीतील सुमारे १७५ सभासद उपस्थित होते.

यावेळी उपायुक्त रवि पवार यांनी नागरिकांच्या शंकांचे निरसन करीत त्यांच्या तक्रारींची नोंद घेतली. त्यात, महापालिकेने केलेली कर आकारणी, कर नोंदणी करताना येणाऱ्या अडचणी मांडण्यात आल्या. या सर्व तक्रारींचे लवकरच निराकरण करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

तसेच, कर रचनेच्या धोरणात्मक बाबींवर महापालिका आयुक्त आणि मुख्य सभेसोबत चर्चा करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले. नागरिकांच्या कर विषयक समस्या सोडविणे व जनजागृती करण्यासाठी शहरातील इतर भागातही 'प्रशासन आपल्या दारी' अभियान राबविण्याचा कर आकारणी व कर संकलन विभागाचा मानस असल्याचे यावेळी सांगण्यात आले. महापालिकेच्या २०२१ मध्ये झालेल्या हद्दवाढीत नांदेड सिटीचा समावेश महापालिकेत करण्यात आला आहे. त्यानंतर या भागातील मिळकतींची नोंदणी महापालिकेकडे करताना २०२१ पूर्वी मिळकतीचे जेवढ्या वेळा हस्तांतरण झाले आहे.

### नागरी सुविधा केंद्रात कर्मचारी वाढविणार

» नांदेड सिटी परिसरात असलेल्या महापालिकेच्या नागरी सुविधा केंद्रात केवळ एकच कर्मचारी असून, त्यांच्याकडून मिळकतधारकांशी वाद घातले जात असल्याची तक्रार यावेळी या भागातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात केली. त्यावेळी या कार्यालयातील कर्मचारी बदलले जाणार असून, दोन ते तीन नवीन कर्मचारी नियुक्त केले जाणार असल्याचे पवार यांनी यावेळी सांगितले.